सम्यक
संवाद व संसाधन केंद्र, पुणे

# मर्जी

## माझ्या शरीरावर माझा हक्क

ऑक्टोबर - डिसेंबर, २०१५
अंक दुसरा

### संपादकीय

'मर्जी'चा हा दुसरा अंक. या माध्यमातून सुरक्षित गर्भसमाप्तीच्या सेवा हा प्रत्येक स्त्रीचा अधिकार असला पाहिजे अशी मांडणी आपण करत असलो तरी स्त्रियांच्या लैंगिक व प्रजनन हक्कांच्या व्यापक दृष्टिकोनातून याकडे पाहिले पाहिजे अशी आपली भूमिका आहे. आजही पितृसत्तेचे पाश स्त्रियांच्या लैंगिकतेला व प्रजननाला नियंत्रणात ठेवतात. पुरुषसत्तेचं महत्त्व टिकवून ठेवण्यासाठी स्त्रियांच्या प्रजनन व्यवहारांशी पाप-पुण्याच्या, पवित्र अपवित्रतेच्या, नैतिक-अनैतिकतेच्या धारणा जोडून समस्त स्त्रियांना नियंत्रणात ठेवण्याचे धर्म आणि पितृसत्तेचे हे राजकारण काही हजार वर्षांपासून चालू आहे.

या सगळ्या राजकारणाचे अंश आजही आपल्याला शबरीमाला किंवा शनिशिंगणापूर सारख्या घटनांमध्ये दिसून येतात. वास्तविक पाहता भारतामध्ये किशोरवयीन मुलींच्या आरोग्य कार्यक्रमांचा भाग म्हणून मासिक पाळीबद्दल जीवशास्त्रीय माहिती मागील दोन दशकांपासून पुरविली जाते. अशा प्रकल्पांवर अब्जावधी रुपयांचा खर्च आजवर झाला आणि 'आरोग्य शिक्षणामध्ये' पडून सॅनिटरी पॅडच्या खाजगी कंपन्यांनीही आपली तुंबडी भरली आहेत. याद्वारे मासिक पाळीसंबंधी कौटुंबिक स्तरावर पाळल्या जाणाऱ्या विटाळावर थोड्याफार प्रमाणात भाष्यही केले गेले. मात्र त्यासंबंधी धर्म-रुढी-परंपरा अशा व्यापक स्तरावर या कार्यक्रमांद्वारे चिकित्सा केली गेली नाही. शबरीमालामध्ये आय्यप्पा मंदिरात स्त्रियांची मासिक पाळी 'शोधून' काढणारे स्कॅनर बसविण्याच्या निर्णयांवर देशाचे प्रजनन धोरण ठरविणाऱ्या व कार्यक्रम राबवणाऱ्या यंत्रणांनी काय भूमिका घेतली? शनिशिंगणापूर येथे तर आता स्त्रियांनाच कार्यकारीणीचे प्रमुख पद देऊन त्यांच्यामार्फतच स्त्रियांच्या मनाईचे समर्थन घडवून आणण्यात येत असल्याचे दिसते. पितृसत्तेच्या मतलबी धेंडांनी पितृसत्तेला मजबूत करण्यासाठी आत्ताही स्त्रीयांचाच उपयोग केला! धर्म आणि पितृसत्तेचे स्त्रियांच्या प्रजननावरील नियंत्रणाचे व आपल्या सोईनुसार त्याला पवित्र किंवा अपवित्र ठरविण्याचे दुतोंडी राजकारण या निमित्ताने सार्वजनिक चर्चेत आले पाहिजे.

'मर्जी'च्या या अंकामध्ये गर्भनिराधकांबद्दल चर्चा केली आहे. केवळ स्त्रियांच्याच शरीरावर केले गेलेले गर्भनिरोधकांचे प्रयोग हे देखील पितृसत्तेच्या छुप्या राजकारणाचेच फलीत आहे. सुमारे १०० वर्षांपूर्वी डॉ. र. धों. कर्वे यांनी पुरुषांनी गर्भनिरोधकांचा वापर करण्याचे महत्त्व समाजाला सांगितले होते. गर्भनिरोधनातील पुरुषांचा सहभाग आजही नगण्यच आढळतो. डॉ. कर्वे यांच्या कामाबद्दल 'इतिहासाच्या झरोक्यातून' मधील डॉ. गीताली वि. मं. यांचा लेख वाचणिय आहे. याशिवाय या अंकामध्ये आदिती गुप्ता हिने 'मेन्स्ट्रुपिडीया' या कॉमिक पुस्तकांमधून मासिक पाळीबद्दल स्त्रीवादी दृष्टिकोनातून चालविलेल्या कामाचीही दखल घेण्यात आली आहे. आपण प्रतिक्रिया कळवालच.

## डोकावून पहा


- संपादकीय ....१
- **विवेचन**
  गर्भनिरोधके ...२
- **इतिहासाच्या झरोक्यातून**
  'कामशास्त्राच्या प्रकाशात संतती नियमन ...३
- **प्रतिक्रिया**
  चळवळीतील साथीदार ...५
- **वार्तांकन**
  थेट संवाद - थेट कृती ...६
- **आम्ही कुठं जायचं?** ...७
- 'मर्जी' माझ्या शरीरावर माझा हक्क! ...८


## खरंच की !






विवेचन

# गर्भनिरोधके

**डॉ. गोरख मंद्रुपकर**
चेअरमन, मेडिकल डीसऑर्डर्स इन प्रेग्नसी कमिटी,
FOGSI



**गर्भानिरोधके आणि राजकारण**

स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजपर्यंत जर पाहिले तर गर्भनिरोधकांचा वापर किंवा एकंदरीत कुटुंब नियोजनाचा विषय हा फारसा गांभीर्याने कुणी घेतलेला नाही. अपवाद १९७६-७७ चा. तेव्हा अतिरेकी 'पुरुषनिर्बीजीकरण' योजना सरकार पडण्यास कारणीभूत ठरली आणि या घटनेनंतर तर एकाही सरकारने अर्थसंकल्पात तरतूद करण्यापलीकडे आणि या विषयाच्या नियोजनाच्या खर्चापलीकडे काही केल्याचे स्मरत नाही.

मधल्या काळात सरकारी संस्थांनी जे काही कार्यक्रम हाती घेतले त्याचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की गेली दहा वर्षे तथाकथित 'बिमारू राज्ये' आणि तेथील योजनांचा विचार केला तर काम कमी- परिणाम कमी- परिस्थिती जैसे थे आणि या विषयावर काम करणाऱ्यांची पोटे मात्र तुडुंब भरली. गाड्या आल्या.

एका मोठ्या कार्यकर्त्या महिलेने एक किस्सा सांगितला- त्यांच्या एका मोठ्या आंतरराष्ट्रीय बैठकीत जेव्हा कॉपर-टीची चर्चा सुरू होती - तेव्हा त्यांच्या हातात - प्रोजेक्ट प्रपोझल अशा ऐवजी बिझनेस प्रपोझल अशा फाईल्स आल्या. अर्थात संयोजकांनी लगेचच फाईल्स बदलून दिल्या. परंतु अशा घटनांतून खरोखरीच असा बिझनेस चालू नाही ना? असा प्रश्न पडतो.

**गर्भनिरोधकांच्या जाहिराती**

एखादी निरोधची जाहिरात पाहिली की वाटतं, आपण एखादा बिभत्स चित्रपटाचा ट्रेलर तर पाहत नाही ना? जाहिरात प्रभावी असावी पण मुख्य गाभा बाजूला आणि नको त्यांचंच प्रदर्शन! सरकारी गर्भनिरोधक गोळ्यांची जाहिरात पाहिल्यावर तर हसावं की रडावं तेच कळत नाही. मिटिंग मधून, पुस्तकांतून यांचा 'पर्लइंडेक्स' ९५ ते ९९% पर्यंत आहे असं अभिमानाने सांगायचं मग जाहिरातींमध्ये हेच नीट समजावून सांगितलं तर बघितलं कुठे? कॉपर-टी ची जाहिरात करताना तिच्याविषयीचे गैरसमज दूर करण्यासंदर्भात मजकूर तयार केले तर बिघडले कुठे?

'इमर्जन्सी पिल्स' च्या जाहिराती तर इतक्या उथळ असतात की, जणू ही अमृताचीच गोळी आहे. एकदा खा आणि काहीही करा. कितीतरी तरुण जोडपी जेव्हा "failure of contraception' म्हणून येतात तेव्हा त्यांच्याशी बोलल्यावर लक्षात येते की गर्भनिरोधनाची आपातकालीन गोळी ही संकल्पनाच त्यांना समजलेली नसते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे केवळ ही गोळी वापरून चालणार नाही तर बरोबर 'निरोध' हवाच कारण गरोदरपणाबरोबरच आपल्याला परस्पर शारीरिक संबंधातून पसरणारे आजारही होऊन द्यायचे नाहीत. पूर्वी निदान कुटुंब नियोजन प्रचाराच्या जाहिराती दाखविल्या जायच्या. पण सध्याच्या जाहिराती आणि आततायी माध्यमांच्या युगात सरकारचे एवढेही बंधन असू नये की काही गोष्टी आवश्यक म्हणून सक्तीच्या कराव्यात. बरं सरकारी जाहिराती पाहिल्या तर त्यातली आवाज रचना, मांडणी, चित्रीकरण इतके बद्दड असते की जाहिरातीचा प्रभावच रहात नाही.

**खरेतर-**

- आपला स्वत:चा असा भारतीय निकषांचा माहितीसंच (डेटा) नाही तो असायला हवा.
- आपल्या वेगवेगळ्या स्तरातील आणि भागातील जोडप्यांचे गर्भनिरोधकांविषयीचे समज आणि गरजा याचा अभ्यास व्हायला हवा.
- सतत पश्चिमात्यांच्या संशोधनांचा वापर करून जसेच्या तसे त्यांचे अनुकरण आपणास बंद करावे लागेल.
- आपण चळवळकर्त्यांनी एकसंध होऊन गर्भनिरोधके - माहिती - समज-गैरसमज - यांचा उघड व विस्तृत माहितीकोश सामान्यांच्या भाषेत - सामान्यांना कळेल असा तयार करायला हवा.

  आपल्या शैक्षणिक पद्धतीत कोठीही शरीरशास्त्र, वयाबरोबर होणारे मानसिक - शारीरिक बदल या विषयी विस्तृत माहिती दिली जात नाही. लोकांना (प्रामुख्याने राज्यकर्त्यांना) लैंगिक शिक्षण म्हणजे 'काहीतरी' वाटते. खरंतर आपल्याकडे किमान १२ वी नंतरच्या सर्व शाखांच्या अभ्यासक्रमात याचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे. कित्येक विद्यार्थ्यांबरोबर सर्व्हे केल्यानंतर जर या विषयीची माहिती तोकडी असल्याचे समोर येत असेल तर इतरांची काय स्थिती असेल याचा विचारच न केलेला बरा. सर्वात जास्त तरुणांच्या देशात मानवी हक्कांची, स्त्री-पुरुष समानतेची व स्त्रियांच्या निवडीच्या स्वातंत्र्याची जपणूक करायची असेल तर गर्भनिरोधकांविषयीचे शिक्षण व सार्वजनिक चर्चा खुलेपणाने सुरू केली पाहिजे.

# कामशास्त्राच्या प्रकाशात संतती नियमन



**डॉ. गीताली वि. मं.**
संपर्क : ९८२२७४६६६३



**क्रांतदर्शी र. धों. कर्वे**

संतती नियमन या शब्दाचे जनक र. धों. कर्वे यांना उपेक्षित द्रष्टा ज्ञानयोगी असं म्हणायला हवं, कारण अमेरिकेत १९१६ मध्ये मार्गारेट सँगर आणि १९२१ साली इंग्लंडमध्ये मेरी स्टोप्स व भारतात र.धों. कर्वे यांनी संतती नियमनाचा सल्ला देणारं व साधनं पुरवणारं केंद्र सुरु केलं. १९२३ साली 'संतती नियमन', नावाचं पुस्तकही त्यांनी प्रकाशित केलं. दोघी विदुषींचं नाव जगभर झालं मात्र र.धों.कर्वे उपेक्षित राहिले. त्यांचं लेखन मराठीत, त्याला सामाजिक मान्यता आणि आर्थिक पाठबळही नाही ही कारणं त्यामागे असावीत. मार्गारेट सँगर व मेरी स्टोप्स यांनी संततीनियमनाची चळवळ स्त्री दुःख विमोचनासाठी चालवली तर र.धों.नी व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिसुखाच्या भूमिकेतून!

मानवी जीवनाचे दोन आधार शरीर आणि आत्मा! आत्म्याची थोरवी अनेकांनी सांगितली मात्र शारीरिक सुख तुच्छ व त्यामागे लागणारा क्षुद्र, लैंगिक सुख घेणे म्हणजे पाप, यामुळे लैंगिक सुख घेण्याविषयीचा अपराधगंड जनमानसात खोलवर रुजलेला आहे. शरीराची थोरवी 'कामसूत्र'च्या आधारे वात्स्यायनानं चौथ्या शतकात संस्कृतमध्ये सांगितली. संस्कृतचे अज्ञान व सुयोग्य भाषांतराच्या अभावी अनेक गैरसमज कामसूत्राविषयी लोकांच्या मनात होते. 'आधुनिक कामसूत्र' हा ग्रंथ लिहून र. धों. नी ही उणीव भरुन काढली. काम हाच मनुष्याचे ठिकाणी अर्थ-अनर्थ, सुख-दुखः, जय-पराजय निर्माण करतो. म्हणून वात्स्यायनानं गृहस्थाश्रमी स्त्री-पुरुषांची संसार यात्रा सुखाची व्हावी यासाठी कामसूत्रम हा ग्रंथ लिहिला, कामवासना अधिक भडकावी म्हणून नव्हे. कामसुत्राचे शिखर गाठण्यासाठी शरीर सुदृढ असणे, मन आनंदी असणे, एकमेकांवर प्रेम असणे व परिसर स्वच्छ असणे आवश्यक आहे. संभोगापेक्षा प्रेम व कामक्रीडेला अधिक महत्त्व दिले जावे. संभोगात मनाचाही सहभाग असतो. प्रेमाची गरज असते समभोग किंवा सम्यक् भोग अशी संभोगाची कोणतीही व्युत्पत्ती मान्य केली तरी या कृतीत, ऋजुता, सहवास व संयोग आवश्यक. स्त्रीची कामवत्ती प्रतिसाद पुरुषापेक्षा वेगळा असतो. स्त्रियांची कामवासना पुरुषांपेक्षा कमी किंवा जास्त असते असे म्हणण्या ऐवजी ती वेगळी असते असेच म्हटले पाहिजे. ती पुरुषांप्रमाणे जननेंद्रियात केंद्रीभूत झालेली नसून सर्व शरीरभर परसलेली असते व त्यामुळे स्त्रीला प्रत्यक्ष समागमापेक्षा चुंबनालिंगनादी बाह्य प्रकार अधिक प्रिय असतात इ. वात्स्यायनाचे मौलिक विचार र. धोंनी पुन्हा एकदा संतती नियमनाच्या हेतुनं समाजमनावर बिंबवण्याचे कळकळीचे प्रयत्न केले.

लैंगिक उपभोग घेऊनही संततीला विरोध करणं हा परमेश्वराविरुध्द केलेला गुन्हा समजला जाई त्या काळात संततीनियमन, गुप्तरोग निवारण, नग्न संघाचा पुरस्कार करणारा हा माणूस कामविज्ञानाचा प्रणेता होता. इंग्लंड, अमेरिकेतही त्या काळात संतती नियमनाचे काम करणाऱ्यांना 'गर्भपाताचे ठेकेदार' म्हणत त्यांच्यावर खटले भरले गेले. त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. र. धों. कर्वेंनाही या सर्व संकटांना सामोरं जावं लागलं.

मुंबईतील भटवाडी येथे र. धों. कर्वे राइट एजन्सीच्या माध्यमातून संतती प्रतिबंधक गोळ्या, गुप्तरोग प्रतिबंधक गोळ्या आणि इतर साधनंही विकत होते. त्यांच्या पत्नी मालतीबाई बायकांना तपासून योग्य आकाराची 'पेसरी' बसवून देत व ती कशी बसवायची हेही शिकवत. संतती प्रतिबंधक वड्यांना त्यांनी चक्क 'यमनकल्याण वटिका' असं नाव ठेवलं होतं. इतके. र. धों. संगीतप्रेमी होते. गुप्तरोग प्रतिबंधासाठी ते जेलोट्यूबही विकत. तेलचिंधीची पध्दत ही र. धों.ची संतती नियमनासाठी असणारी युक्ती वापरुन त्यांचे वडील धोंडो केशव कर्वे यांच्या शंकर, दिनकर, भास्कर या मुलांमध्ये अंदाजे पाच वर्षांचं अंतर होतं असा दावा केला जातो. संतती प्रतिबंधासाठी गोळ्या, साधनं यांचा प्रसार-प्रचार करण्यावर ते थांबले नाहीत तर त्यांनी कामशात्राचा सखोल अभ्यास केला. फ्रान्समध्ये पंधरा महिने गणितातलं शिक्षण घेत असताना त्यांनी कामशास्त्राची फ्रेंच पुस्तकं वाचली आणि त्या समाजाचा बारकाईनं अभ्यास केला.

दुसऱ्याच्या सुखासाठी झटणे हे कामशास्त्राचे मुख्य नीतीतत्त्व आहे. स्त्रीच्या सुखावर समागमाचे नियम बसवणाऱ्या वात्स्यायनाचा र. धों.नी गौरव केला. कारण लॅटिन व ग्रीक भाषेत लेखन करणाऱ्या पाश्चिमात्य तज्ज्ञांनी केवळ पुरुषांच्या सुखासच महत्त्व दिले होते. स्त्री प्रश्नाच्या दृष्टीनं हे पाऊल खूप महत्त्वाचं आहे.

वात्स्यायनाच्या ८४ आसनांपैकी फक्त ४, ५ आसनंच निश्चित अशा आपत्य प्राप्तीसाठी करावीत असं त्यानं सांगितलं होतं व त्याची कारणमीमांसाही दिली होती 'आधुनिक कामशास्त्र' या र. धों च्या पुस्तकात अपत्य संभव टाळण्यासाठी एक नैसर्गिक पद्धती म्हणून त्या ४-५ आसनांखेरीज इतर आसनं कामक्रीडेस्तव वापरावीत व त्यात नैपुण्यप्राप्त करून घ्यावं असं त्यांनी सुचवलं.

''स्त्रीला संततीची इच्छा असता ती न होणे हे तिला आयुष्यभर दु:खास कारण होऊ शकते! तरी मुलांची इच्छा नसता ती होणे हे त्यापेक्षाही जास्त दु:खास कारण होऊ शकते हे निर्विवाद आहे. मुले किती असावीत व ती केव्हा व्हावीत हे ठरविण्याचे स्वातंत्र्य स्त्रीलाच हवे.'' स्त्रीला बाळंतपणापासूनचे स्वातंत्र्य असावे हा क्रांतदर्शी विचार निर्भीडपणे मांडणाऱ्या र.धों.नी ३३ वर्ष अतिशय निष्ठेनं, निश्चयानं आणि निर्धारानं प्रतिकूल परीस्थितीशी दोन हात करत संततीनियमनाचं कार्य केलं. ते म्हणत, ''साधने वापरुन फसल्यास गर्भपाताचा प्रसंग अनेक स्त्रियांवर येतो. कायदा बदलल्यास गर्भपात अधिक सुरक्षित मार्गाने होतील व त्यापासून नुकसान कमी होईल. कुमारिकांना व विधवांनाही या साधनांचा वापर उपलब्ध करून देणारे व त्याचे समर्थन भाषण व लेखनातून करणारे र. धों. काळाच्या फार पुढे होते. त्यानंतर चाळीस - पन्नास वर्षांनी अवांच्छित गर्भसमाप्ती कायदा १९७२ साली आला. 'आमच्या देहावर आमचा अधिकार' या स्त्रीवादी घोषणेची ही पायाभरणी म्हणावी लागेल.

स्त्रीप्रश्नांसंदर्भात कळीचा असलेला लैंगिकतेचा मुद्दा र. धों.च्या संतती नियमनाच्या कामाच्या केंद्रस्थानी होता. स्वत:ला बुध्दीवादी म्हणवणारे लोकही या विषयात बुध्दीवादाचा उपयोग करण्यास तयार नव्हते. अनेक विचारवंत, बुध्दीवंत, सुधारक, सामाजिक कार्यकर्तेही लैंगिकता हा विषय अपवित्र, अश्लील, घाणेरडा मानून त्याविषयी ब्र ही काढत नव्हते. कामशास्त्र व तदनुषंगिक इतर लिखाणावर आधुनिक शास्त्रीय पध्दतीनं स्वतंत्र विचार प्रसिध्द करण्यास इतर पत्रे, नियतकालिके तयार नव्हती. या पार्श्वभूमीवर 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार' या आगरकरी बाण्यानं त्यांनी लैंगिकता हा विषय समाजस्वास्थासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लावून धरला.

लिंग विज्ञान, संतती नियमन, बुध्दीवाद, विचार स्वातंत्र्य यांचा प्रसार-प्रचार करण्यासाठी 'समाज स्वास्थ' हे मासिक १९२३ ते १९५३ या कालावधित अखंडपणे प्रकाशित केलं. 'अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूंचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणाऱ्यांच्या मनाचा गुण आहे.' हे वाक्य या मासिकावर छापलेलं असे. विनय म्हणजे सामाजिक ढोंग आहे. वस्तुत: पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या नग्न शरीराकडे तटस्थवृत्तीने पाहण्यास लाज वाटण्याचे कारण नाही. उत्तम आरोग्यासाठी सर्वांगाला पुरेशी हवा लागण्यासाठी काही तास सूर्याच्या उजेडात मोकळ्या हवेत नग्न असले पाहिजे. असे किती जणांना शक्य आहे? सार्वजनिक ठिकाणी असे केल्यास कायद्याने अशा लोकांवर फिर्याद करण्याचा कुणासही हक्क आहे. अशा स्थितीत नग्न संघ स्थापन केल्यावरच हे होऊ शकेल असं ते म्हणत. हे संघ मिश्र असल्यास मानसिकदृष्ट्या त्याचा उपयोग होतो. विनयाच्या फाजिल कल्पनांमुळे उत्पन्न झालेल्या फाजिक जिज्ञासेपोटी ज्यांचे मन:स्वास्थ्य बिघडलेले असते असे पुष्कळ लोक सुधारलेल्या म्हणवलेल्या समाजात असतात. त्यांना नग्नसंघ म्हणजे एक मानसिक उपचारच होय. मिश्र संघात फाजिल उद्दीपन होईल ही कल्पना अनुभवाने चुकीची ठरली आहे. नग्नता हीच नैसर्गिक स्थिती असल्याने मन:स्वास्थ लाभते. सत्य हे नग्नच असते असं म्हणत प्रखर सत्यनिष्ठ असणाऱ्या र. धों.नी समाजस्वास्थ मासिकाच्या मुखपृष्ठावर नग्न, अर्धनग्नक स्त्रीचं चित्र सातत्यानं छापलं. मात्र नग्नपुरुषाचं चित्र मुखपृष्ठावर कधी नव्हतं हे आवर्जून नोंदवायला हवं.

''... एकमेकांच्या संमतीने कोणीही स्त्री-पुरुष समागम करतील तर ते गैर नसून हा प्रत्येकाचा हक्क आहे. स्त्री पुरुष संबंधांपासून जो पर्यंत संतती किंवा रोग प्रसार होत नाही तो पर्यंत ती खासगी बाब समजण्यातच समाजाचे हित आहे. पातिव्रत्य हे नैसर्गिक नसून ती पुरुषी अरेरावी आहे. समागम स्वातंत्र्याच्या मार्गात विवाह संस्थेचा अडसर येत असेल तर तोही व्यक्तीने बाजूला सारावा. विवाहाच्या पावित्र्याचे ढोंग सोडून इतर करारांप्रमाणे हाही करार दोघांच्या सोई प्रमाणे मोडता येईल अशी व्यवस्था हवी. ज्यांना विवाहात सुख मिळत नसेल त्यांना तो मोडण्याची परवानगी पाहिजे व तो मोडण्यात कोणत्याही रीतीने त्या व्यक्तीला कमी लेखता कामा नये.''

लैंगिक स्वातंत्र्य पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही द्यायला तयार असलेले र. धों. हे स्वातंत्र्य वापरतांना स्त्रीने आपल्या वाट्याला निसर्गाने दिलेली भूमिका वठवण्यातच तिचे हित आहे, निसर्गानेच स्त्रीला गौण स्थान दिले, त्यानुसार वागले तर स्त्रियांचे भले होईल असं ते म्हणत. स्वातंत्र्याचा अर्थ समानता होऊ शकत नाही. स्वातंत्र्याचा अर्थ त्यांच्यावर पुरुषांचा ताबा असू नये इतकाच होतो. गुलामगिरी नसली आणि स्त्रियांना स्वातंत्र्य असले म्हणून स्त्री-पुरुष श्रमविभागणी असू नये असे नाही. यंत्रांनी घरकामाचे कष्ट कमी होतील आणि मग त्यात कमीपणा वाटण्याचे कारण नाही. स्त्रीस्वातंत्र्य असून चूलमूल सांभाळावी आणि ही कामे करण्याबद्दल त्यांना पगार द्यावा असेही म्हणणारे खूप आहेत आणि ते रास्त आहे असं र. धों.चं मत होतं.

वेश्यांचा व्यापार बंद करण्यावर स्वैर संभोग हा एकच मार्ग आहे. स्वेच्छेने एकत्र राहून वेश्या धंदा करु लागल्यास त्यांना आडकाठी करु नये. ''.... हल्लीच्या विवाहसंस्थेच्या मुळाशी स्त्रीच्या शरीरावर पुरुषाचा जो अमर्याद हक्क आहे तो नाहीसा होणे आवश्यक आहे. व्यभिचाराचा कलंक फक्त स्त्रीला लागतो.'' सप्टेंबर १९३१ च्या 'समाजस्वास्थ्य'मध्ये 'व्यभिचाराचा प्रश्न' हा त्यांनी लिहिलेला लेख प्रकाशित झाल्यावर ते अंक जप्त केले गेले आणि त्यांना अटक होऊन त्यांच्यावर खटला भरला गेला. मात्र त्यानंतर मासिकाचे वर्गणीदार वाढलेच.

मी जे कार्य करणार त्यासाठी मला मूल नको असं र.धों.नी सांगितल्यावर स्वत:च्या आईची पंधरा वर्षात पंधरा बाळंतपण पाहिलेल्या मालतीताईंनी मला मूल नको असं निर्भीडपणे सांगितलं आणि र. धों.ना आजन्म संततीनियमनाच्या कामात साथ दिली. भिन्न लिंगी लैंगिक संबंध ठेवणारे स्त्री-पुरुष, समलैंगिक संबंध ठेवणाऱ्या व्यक्ती, उभयलिंगी संबंध ठेवणाऱ्या व्यक्ती, हिजडे आणि ट्रान्सजेंडर सर्वांनी आपल्या आणि इतरांच्या लैंगिकतेविषयी सन्मानाची भावना ठेवणं हीच मालतीबाई आणि रघुनाथराव कर्वे यांच्या कार्यकर्तृत्वाला खरी आदरांजली !

संदर्भ - उपेक्षित योगी

**मधुसूदन गोखले**

नवसाहित्य बुकस्टॉल, बेळगाव



"'सम्यक' मार्फत सुरु करण्यात आलेली ही प्रक्रिया अतिशय महत्त्वाची आहे. यामुळे PCPNDT कायद्याबरोबरच MTP कायदा, त्याची अंमलबजावणी आणि महिलांसाठी या कायद्याचे महत्त्व याबद्दल माहिती मिळायला सर्वांनाच मदत झाली. मला असे वाटते की या प्रक्रियेमुळे गर्भपातासंदर्भातील विस्तृत चर्चेला वाव मिळतो. या बैठकीने जिल्हा पातळीवर खाजगी वैद्यकीय व्यावसायिक आणि सरकारी अधिकारी यांच्या संबंधांमध्येही काही बदल झाल्याचे जाणवतात. वैद्यकीय व्यावसायिक गर्भपातासंदर्भातील अनेक कागदोपत्री बाबींसंदर्भात जागृत झाले आहेत आणि त्यामुळे कायद्याचे पालन चांगले होत असताना दिसते. आमच्या क्षेत्रातील वैद्यकीय व्यावसायीकांना या बैठकीचा फायदाच झालाय अस दिसतंय आणि सरकारी अधिकारी म्हणून यात आमचाही फायदा होतो कारण कागदपत्रांच्या बाबतीत असणारे गैरसमज टाळता येतात. यापुढेही ही प्रक्रिया बीड जिल्ह्यामध्ये सुरु ठेवावी असे मला वाटते. आम्ही आमच्या विभागात असणारे वैद्यकीय अधिकारी व निवासी वैद्यकीय अधिकारी यांच्यासाठीही या विषयासंदर्भातील प्रशिक्षण आयोजित करू इच्छितो आणि यासाठी 'सम्यक' संस्थेने आम्हाला मदत केली तर ते खूप उपयोगी ठरेल."

**डॉ. अशोक बोल्डे,**
**जिल्हा शल्यचिकित्सक, बीड**



"सुरक्षित गर्भपाताच्या मुद्द्यावर 'सम्यक'ने सुरु केलेली चळवळ हे अतिशय महत्त्वाचे काम आहे असे मला वाटते. स्त्रियांच्या बाजूने गर्भपाताच्या मुद्द्यावर सरकार आणि डॉक्टर्स बरोबर बोलणारी ही पहिलीच संस्था मी पहिली. औरंगाबाद मध्ये सम्यक मार्फत घेण्यात आलेल्या मिटींगमध्ये PCPNDT कायदा आणि MTP कायदा यांबद्दल मांडलेले मुद्दे अतिशय महत्त्वाचे होते. स्त्रियांच्या बाजूने गर्भपाताच्या सेवांची मागणी करत असतानाच, गर्भपाताच्या सेवा पुरविणाऱ्या आम्हा सर्वांना कोणाची आणि कशी मदत घ्यायची याबद्दल या मिटींगमध्ये खूप चांगली चर्चा झाली. मी इथल्या सोसायटीचा अध्यक्ष आहे त्यामुळे मला अनेकांनी मेसेज करून मीटिंगबद्दल सकारात्मक मते कळवली.

आत्ता परिस्थिती अशी आहे की आमच्या जिल्ह्यात अनेक डॉक्टर्स PCPNDT कायद्याचा ताप नको म्हणून गर्भपाताच्या सेवा द्यायला नको म्हणतात. सर्वांच्या मनात खूप भीती आहे आणि त्याचा परिणाम असा होतोय की अनेक महिलांना आम्ही सरकारी दवाखान्यात पाठवतो किंवा सरळ नाही म्हणून सांगतो. आम्हा सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपाताच्या सेवा पुरविणाऱ्या डॉक्टर्सची असुरक्षितता जोवर संपणार नाही तोवर हे असेच चालू राहील. कदाचित गर्भपाताच्या सेवा देणे डॉक्टर पूर्णपणे बंद करून टाकतील. म्हणून 'सम्यक' चे काम मला महत्त्वाचे वाटते यामुळे आम्हाला मोठा आधार वाटतो आहे. आमची संघटना बेकायदेशीरपणे लिंगनिदान करणाऱ्यांच्या विरोधात आहेच पण त्याचबरोबर सुरक्षित गर्भपाताच्या सेवा पुरविणाऱ्या डॉक्टर्सच्या बाजूनेही आम्ही उभे आहोत. सम्यकने सुरु केलेल्या या प्रक्रियेला आम्हा सर्वांचा नेहमीच पाठींबा असेल. तुमच्या कामासाठी शुभेच्छा!"

**डॉ. राजेंद्रसिंह परदेशी**
**अध्यक्ष, औरंगाबाद ObGy सोसायटी.**



"गावातील महिलांसोबत कार्य करतांना, मुलीचा जन्म नाकारलेली कुटूंबं मला पाहायला मिळाली, त्यांचा मनातील स्त्री जन्माची भिती अनुभवता आली. आम्ही आमच्या संस्थेच्या वतीने ''स्त्री जन्माचे स्वागत'' आणि PCPNDT कायद्याची जागृती हे दोन कार्यक्रम मोठ्या प्रमाणात सुरू केले.

PCPNDT कायद्याची अंमलबजावणी करतांना गर्भलिंग चिकित्सेच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रीत करण्याच्या ऐवजी गर्भसमापनाच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रीत केल्यामुळे स्त्री रोग तज्ञ नाराज होते. PCPNDT कायद्याच्या अंमलबजावणीच्या पद्धतीमध्ये 'धाडसत्र' पद्धतीचा अवलंब केल्यामुळे गर्भपातासंबंधी दहशत निर्माण झाली होती. बीडमधील सर्व स्त्रीरोग तज्ञांनी गर्भपात करणे बंद केले होते. त्यामुळे गरजू महिलांना सुद्धा गर्भपाताच्या सुविधा मिळत नव्हत्या.

स्त्रीयांचा सन्मानाचा विचार करत असतांना तिच्या शरीरावरती तिचाच अधिकार ही संकल्पना समोर ठेवून 'सम्यक'च्या पुढाकाराने मराठवाड्यात 'मानिनी' गट आणि 'मर्जी हॉटलाईन' या माध्यमातून सुरक्षित गर्भपातासंदर्भातील चर्चा आम्ही विविध गटांसोबत सुरू केली आहे."

**मनीषा तोकले**
**जागर संस्था बीड**

# थेट संवाद – थेट कृती



'लिंगनिदानाला विरोध करत असतानाच स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळाव्यात' या समर्थनार्थ सम्यक मार्फत सुरु करण्यात आलेल्या प्रक्रियेला एक वर्ष पूर्ण झाले. मागच्या वर्षभरात कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, पुणे, बीड, औरंगाबाद, लातूर, उस्मानाबाद आणि नांदेड या दहा जिल्ह्यांमध्ये विविध संस्था-संघटना, पत्रकार, सरकारी यंत्रणा आणि गर्भपाताच्या सेवा पुरविणारे व्यावसायिक यांच्या गटांसोबत सातत्याने वेगवेगळ्या चर्चांचे आयोजन करण्यात येत आहे. ऑक्टोबर २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

- **'मर्जी हॉटलाईन'चा विविध गटांबरोबर आणि विविध ठिकाणी प्रचार आणि प्रसार:**

मर्जी हॉटलाईनचा प्रचार आणि प्रसार मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील गटसदस्य त्यांच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर करत आहेत. आजपर्यंत बीड, औरंगाबाद, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, सोलापूर, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यांमध्ये जिल्हा आणि ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्यकेंद्रे, खाजगी स्त्री-रोगतज्ज्ञांचे दवाखाने आणि शहरांमधील किंवा गावांमधील विविध ठिकाणे जेथे स्त्रियांचा वावर जास्त असतो अशा अनेक जागांमध्ये 'मर्जी हॉटलाईन'चे स्टिकर्स लावले गेले आहेत.

✻ मच्छिंद्र गवाले, गटसदस्य नांदेड यांनी डिसेंबर महिन्यात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आयोजित केल्या गेलेल्या महिला मेळाव्यात १००० युवती आणि आशा-कार्यकर्त्यांसोबत सुरक्षित गर्भपात आणि 'मर्जी हॉटलाईन' संदर्भात संवाद साधला. याचबरोबर नांदेड जिल्ह्यातील चार प्राथमिक आरोग्यकेंद्रे आणि काही खाजगी रुग्णालयांमध्ये 'मर्जी हॉटलाईन'चे स्टिकर्स लावले. मच्छिंद्र गवाले यांचे अभिनंदन !



**'मर्जी हॉटलाईन'च्या पोस्टर सोबत डॉ. एम. एम. कदम, तालुका आरोग्य अधिकारी, राधानगरी, कोल्हापुर व त्यांचे सहकारी**

✻ सत्यभामा सौंदरमल, माजलगाव, बीड यांनी माजगाव येथील ग्रामीण रुग्णालयात 'मर्जी हॉटलाईन'चे स्टिकर्स लावले आणि तेथील प्रमुखांबरोबर संवाद साधला. त्यांनी सरकारी रुग्णालयातच एका महिलेला सुरक्षित गर्भपात करून घेण्यासाठी माहिती दिली आणि मदतही केली.

- **कराड येथे खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांबरोबर चर्चासत्र**

दिनांक २६ नोव्हेंबर २०१५ रोजी कराड येथे कराड ObGyn सोसायटीच्या मदतीने खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांबरोबर एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण २८ खाजगी वैद्यकीय व्यावसायिक सहभागी झाले होते. या चर्चासत्रात नको असलेल्या गरोदरपानाची कारणे आणि परिणाम, जेन्डर व्यवस्था आणि लिंगनिदान यांचा परस्पर संबंध, लिंगनिदान विरोधी कायदा आणि गर्भपाताचा कायदा यांमध्ये गल्लत केल्याने गर्भपाताच्या सेवांवर येणारी बंधने आणि त्यातून उद्भवणारे दुष्परिणाम आणि



**हानेगाव प्रा. आ. केंद्र जि. नांदेड येथे 'मर्जी हॉटलाईन'चे स्टीकर लावताना डावीकडून श्री. मच्छिंद्रभाऊ गवाले आणि प्रा. आ. केंद्र सेवक**



**कराड : खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या चर्चासत्रात गटचर्चा करताना सहभागी**

स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळाव्यात यासाठी वैद्यकीय व्यावसायिक म्हणून आपली काय भूमिका असावी या विषयांवर चर्चा केली गेली.

सुरक्षित गर्भपात किंवा लिंगनिदान या दोनही मुद्द्यांची मांडणी स्त्रियांच्या बाजूने करावी आणि याचबरोबर सेवा पुरवीत असताना स्त्रीचे हित केंद्रस्थानी असायला हवे आणि त्यासाठी काय करता येईल याबद्दलची चर्चा सुरु व्हावी असा या चर्चासत्राचा हेतू होता. या चर्चासत्राचे आयोजन करण्यासाठी कराड Ob-Gyn सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आशुतोष बहुलेकर यांनी मदत केली.

- **मराठवाडा विभागातील 'मानिनी : सुरक्षित गर्भपाताच्या हक्कांसाठीचा गट'च्या सदस्यांबरोबर कार्यशाळा**

मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन विभागांमध्ये लिंगनिदानाला विरोध करत असतानाच स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळाव्यात या संदर्भात विविधगटांबरोबर संवाद साधण्यासाठी दोन गट तयार करण्यात आहेत. दोनही विभागात लिंगनिदान विरोधी किंवा महिला आरोग्याच्या मुद्द्यावर काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी या गटाचे सदस्य आहेत.

'सम्यक'ने मराठवाड्यात स्थापन केलेल्या 'मानिनी' या गटासोबत दि. १६ ते १८ डिसेंबर २०१५ या कालावधीत कार्यशाळा घेण्यात आली. लिंगभाव, पितृसत्ता, सुरक्षित गर्भपात आणि गर्भलिंगनिदान, गर्भलिंगनिदानाच्या मुद्यासंदर्भात प्रसृत होणारी संवादाची साधने आणि त्यांची भाषा या मुद्द्यावरती समज वाढविण्यासाठी सत्रे या कार्यशाळेत घेण्यात आली. याचबरोबर सुरक्षित गर्भपाताचा मुद्दा लोकांपर्यंत पोचविण्यासाठी वापरायची भाषा कशी असावी, कोणकोणत्या गटांबरोबर ही सत्रे घेता येतील याबद्दलची चर्चाही सहभागींनी केली.

या कार्यशाळेच्या शेवटी सहभागींनी ठरविले की–

त्यांच्या कार्यक्षेत्रात सरकारी अधिकारी, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक, पत्रकार, स्वयंसेवी संस्था-संघटनांचे लोक, गावातील महिला आणि विद्यार्थी यांसोबत चर्चा किंवा कार्यशाळा घेण्यासाठी झालेल्या सत्रांचा वापर केला जाईल.

जानेवारीमध्ये होणाऱ्या ग्रामसभांमध्ये आपापल्या गावांमध्ये सुरक्षित गर्भपाताच्या सेवांसंदार्भातील ठराव घेतला जाईल. औरंगाबाद, बीड, लातूर, उस्मानाबाद आणि नांदेड या पाच जिल्ह्यांमधील एकूण १४ प्रतिनिधी या कार्यशाळेत सहभागी झाले होते. या कार्यशाळेमुळे मराठवाडा विभागात सुरक्षित गर्भपाताच्या मुद्द्यावर जनवकालत करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी तयार होताना दिसते आहे.

### ठराव

**आम्ही आमच्या गावातील सर्व ग्रामस्थ लिंगनिदानाला विरोध करतो. सोबतच महिलांना शासकीय आरोग्य सेवांनी सुरक्षित गर्भपाताच्या सेवा नाकारू नयेत असा ठराव आम्ही घेत आहोत.**

**सूचक :**
**अनुमोदक :**


## आम्ही कुठं जायचं?

संगीता (नाव बदलले आहे) मराठवाड्यातील एका गावात रहाते. ती आत्ता साधारण पणे २५ वर्षांची असेल. ४ वर्षांपूर्वी तिचे लग्न झाले आणि त्यानंतर ३ वर्षांनी, मार्च २०१४ मध्ये ती पहिल्यांदा गरोदर राहिली. घरीच तपासणी करून आपण गरोदर आहोत हे तिला समजले. त्यानंतर तीन महिन्यांनी ती गावातीलच एका खाजगी स्त्री-रोग तज्ज्ञांकडे गेली. तिथे सोनोग्राफी तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी तिला सांगितले की तीन महिने पूर्ण झाले आहेत आणि गर्भाच्या किडनीला सूज आहे. डॉक्टरांनी तीला एक महिन्याच्या गोळ्या लिहून दिल्या आणि परत महिन्याभराने भेटायला यायला सांगितले. एक महिन्यानंतर पुन्हा सोनोग्राफी केली आणि गर्भाच्या किडनीला सूज असल्याने गर्भपात करावाच लागेल हे निश्चित झाले. तरीही दुसऱ्या डॉक्टरचे मत घ्यावे म्हणून संगीता आणि तिचा नवरा शहरातील एका दवाखान्यात गेले. पण तेथेही त्यांना हेच उत्तर मिळाले.

शेवटी संगीता आणि तिच्या कुटुंबियांनी गर्भपात करायचे निश्चित केले. या सगळ्या प्रक्रियेमध्ये एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी निघून गेला होता. त्यानंतर संगीता सरकारी दवाखान्यात दाखल झाली. तिथे तिला सात दिवस ॲडमिट करून घेतले पण गर्भपात केला नाही. संगीता किंवा तिच्या घरच्यांनी विचारल्यानंतर 'होईल गर्भपात', 'करूयात नंतर' किंवा 'आम्हाला माहिती नाही' अशी उडवा-उडवीची उत्तरे त्याना दिली जात होती. शेवटी सात दिवसांनी त्यांना सांगण्यात आले की, इथे गर्भपात होणार नाही तुम्ही दुसऱ्या जिल्ह्याच्या दवाखान्यात जा. त्यानंतर संगीताला दुसऱ्या जिल्ह्याच्या दवाखान्यात नेण्यात आले. तिथे तिची कागदपत्रे पाहून डॉक्टरने सांगितले की संगीताचे २० आठवडे पूर्ण झालेत आता गर्भपात होणे शक्य नाही. तुम्हाला बाळाला जन्म द्यावा लागेल.

त्यानंतर संगीता आणि तिच्या कुटुंबीयांकडे बाळंतपण करण्याशिवाय कोणताही पर्याय नव्हता. सात महिन्यात संगीताचे बाळंतपण करावे लागले. सरकारी दवाखान्याला वैतागलेली संगीता खाजगी दवाखान्यात गेली. तिथे डॉक्टरने सांगितले की सिझेरियन करावे लागेल लगेचच दहा हजार रुपये आणून भरा नाहीतर पेशंट घेणार नाही. संगीताची आई आणि नवऱ्याने उसने दहा हजार रुपये आणून भरले आणि बाळंतपण झाले. जन्माला आलेले बाळ दोन तासातच गेले. त्या तणावात संगीताला आणखीनच त्रास वाढला. शेवटी डॉक्टरने अजून तीस हजाराचे बील केले आणि ते आणून भरल्याशिवाय पेशंट सोडणार नाही असे सांगितले.

संगीताच्या नवऱ्याने व्याजाने पैसे आणून भरले आणि तिला घरी नेले. संगीता जमेल तसे धुण्या-भांड्यांचे काम करते आणि तिचा नवरा दिवसाला २०० रुपये याप्रमाणे एका चहाच्या दुकानात काम करतो. दोघेही बाळंतपणाचे कर्ज अजूनही फेडत आहेत.






**आदिती गुप्ता**

# 'मर्जी' माझ्या शरिरावर माझा हक्क!

आदिती गुप्ता ही झारखंड राज्यातील एका शहरात रहाणारी मुलगी. लहानपणापासून मासिक पाळी संदर्भातील अनेक गोष्टी ऐकत आणि अनुभवत मोठी झाली. मासिक पाळी बद्दल आपल्या आसपास बोलल्या जाणाऱ्या अनेक अतार्किक गोष्टी तीला नेहमीच खटकायाच्या. हळू-हळू तिच्या हे लक्षात आले की, गावातच काय पण शहरांमध्येही मासिक पाळीला विटाळ मानले जाते. अनेक मुलींना, स्त्री-पुरुषांना मासिक पाळीबद्दल माहिती नसते.

९ ते १४ वर्षांच्या मुली आणि मुलांनाही मासिकपाळी बद्दल सोप्या भाषेत माहिती मिळावी यासाठी आदिती आणि तिच्या सहकाऱ्यांनी 'मेन्स्ट्रुपीडिया' या नावाचे कॉमिक प्रकाशित केले. किशोर वयात होणारे शारीरिक आणि मानसिक बदल, मासिक पाळी म्हणजे काय, मासिक पाळीतील स्वच्छता अशा विषयांवर या कॉमिकच्या माध्यमातून माहिती मिळते. हे कॉमिक मराठीमध्येही उपलब्ध आहे.

'मेन्स्ट्रुपीडिया'च्या निमित्ताने आदितीची छोटी मुलाखत आम्हाला घेता आली. या कॉमिकच्या लेखनामागाची प्रेरणा काय होती असे सांगताना ती म्हणाली की, ''माझ्या स्वत:चे मासिक पाळीबद्दलचे अनुभव आणि आसपासची परिस्थिती पाहून मला सतत वाटायचे की, सोप्या भाषेत मासिक पाळीबद्दल माहिती दिली तर अनेकांना त्याची मदत होईल त्यामुळेच हे कॉमिक तयार झाले''.

कॉमिक बद्दलच्या चर्चेबरोबरच आदितीला शबरीमाला मंदिराबाबतही प्रतिक्रिया विचारली तेव्हा ती म्हणाली की, 'मासिक पाळीला विटाळ मानणाऱ्या सर्वांना मी सांगू इच्छिते की, ज्या मासिक पाळीच्या रक्ताला तुम्ही विटाळ मानता त्यामुळेच तुम्ही सगळे जन्माला आला आहात. जे रक्त जन्माआधी तुम्हा सर्वांना पोषण देत होतं ते खराब किंवा विटाळ कस असू शकेल?' याचबरोबर या सगळ्या चर्चेमध्ये निकिता शर्मा नावाच्या तरुणीने 'हॅपी टू ब्लीड' या फेसबुक वर सुरु केलेल्या अभियानाबद्दलही आदितीने माहिती सांगितली आणि शबरीमाला मंदिराच्या अस्थापन समितीच्या अध्यक्षांनी केलेल्या विधानालाही विरोध केला.

आपल्यापैकी अनेकांच्या कुटूंबात किशोरवयात येणाऱ्या मुली आणि मुले असतीलच. 'मेन्स्ट्रुपीडिया' हे कॉमिक आपल्या सर्वांना नक्की उपयोगी पडेल. याबद्दलची माहिती http://www.menstrupedia.com/comic/marathi या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

## पुढील अंकात वाचा...!

मर्जी
माझ्या शरीरावर माझा हक्क
ऑक्टोबर - डिसेंबर, २०१५
अंक दुसरा

**कार्यकारी संपादक**
आनंद पवार

**संपादक मंडळ**
मिलिंद चव्हाण, डॉ. गोरख मंद्रुपकर
मनिषा तोकले, ज्योती भालकर,
प्रितम पोतदार

**मांडणी व छपाई**
संस्कृती डिझायनर्स, पुणे

खाजगी वितरणासाठी

**बुक-पोस्ट**

सम्यक
संवाद व संसाधन केंद्र, पुणे

SAAF

IPPF

**प्रकाशक:**
**सम्यक - संवाद आणि संसाधन केंद्र**
बी३/१४, दामोदर नगर, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे ४११०५१
**फोन : +९१ ९४०३५१६२३७ ईमेल :** samyak.pune@gmail.com